विद्यापीठ अनुदान आयोग व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने

## राष्ट्रीय चर्चासत्र

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाड्.मय




(प्रोसिडिंग)

ISBN-978-93-83401-45-1

दि.२३ व २४ सप्टेंबर २०१६

संपादक: डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय

राष्ट्रीय चर्चासत्र

दि. २३ ते २४ सप्टेंबर

आयोजक

मराठी विभाग

न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

प्रमुख मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे

सल्लागार संपादक

डॉ. सुनीता भांगेपाटील

संपादक

डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे

संपादक मंडळ

प्रा. मीना कोहोक

डॉ. महेबुब सय्यद

डॉ. नवनाथ येठेकर

ISBN – 978-93-83401-45-1

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्.मय

ISBN – 978-93-83401-45-1
सप्टेंबर २०१६.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

संपादक
डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे

©
प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे
न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर
ता.जि. अहमदनगर–४१४००१ महाराष्ट्र

प्रकाशन
शब्दगंध प्रकाशन
फुलोरा, लक्ष्मी कॉलनी, तपोवन रोड,
कसबे वस्ती, सावेडी, अहमदनगर.

मुद्रक
शिवमंगल कलेक्शन

प्रथमावृत्ती
२३ सप्टेंबर २०१६

मुखपृष्ठ
श्री. सतीश कुलकर्णी

---

(या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील विचारांशी संपादक मंडळ, प्राचार्य, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# साहित्यप्रेमी यशवंतराव चव्हाण

डॉ.काळे बी.एम.
सहयोगी प्राध्यापक
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ
जि.परभणी

भारताच्या राजकीय इतिहासात यशवंतराव चव्हाण यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसताना देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. ते एक द्रष्टे नेते, द्रष्टे साहित्य रसिक आणि द्रष्टे विचारवंत होते. साहित्याची जशी त्यांना गोडी होती तशीच त्यांना राजकारणाचीही आवड होती. 'पुस्तके' आणि 'मानसे' या दोन्हींचा त्यांना सारखाचा हव्यास होता. त्यामुळे त्यांच्या स्वभावात एक प्रकारची बहुश्रुतता आलेली होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी श्री.म.य.दळवी लिहितात, "महाराष्ट्राच्या इतिहासात संयमशील, सहिष्णू, राजकीय मुत्सद्दी, साहित्य, कला यांचा उत्तम दर्दी रसिक आणि गुणग्राहक नेता असे वर्णन कुणी केले तर न चुकता यशवंतराव चव्हाण यांची मूर्ती डोळयांसमोर उभी राहते." तर त्यांची साहित्याविषयक भूमिका मांडतांना अनंतराव पाटील म्हणतात, "राजकारणात राहूनही यशवंतरावांनी जे वाचन आणि लेखन केले त्याला तोड नाही. आपण साहित्यिक आहोत, थोर लेखक आहोत, असा दावा कधी केला नाही. यशवंतराव म्हणायचे की, साहित्य क्षेत्रात माझी मूळ आणि आवडती भूमिका रसिक वाचकांशी आहे, शब्दांच्या सामर्थ्यावर आणि सौंदर्यावर माझा नितांत विश्वास आहे. कल्पना, विचार आणि शब्द या त्रिवेणी संगमातही एक जबरदस्त शक्ती आहे." त्यांनी शिवनेरीच्या नौबती, सहयाद्रीचे वारे, युगांतर, ऋणानुबंध, भूमिका, कृष्णाकाठ इत्यादी पुस्तकाचे लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रास अनेक पारितोषिके प्राप्त झाली.

त्यांचा जन्म सातारा जिल्हयातील देवराष्ट्र या गावी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कराड मध्ये झाले पुढे त्यांनी मुंबई विद्यापीठातून इतिहास व राज्यशास्त्र या विषयात बी.ए.ची पदवी संपादन केली. शालेय शिक्षण सुरु असतानाच ते स्वातंत्र्य चळवळीने प्रेरित झाले होते. त्यांच्यावर सत्यशोधक चळवळीचा प्रभाव पडला होता. सत्यशोधकी ब्राम्हणेतर चळवळ, हरिजन चळवळ, रॉयचा नवमानवतावाद व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रभावातून त्यांच्या सामाजिक विचारांची जडण घडण झाली होती. मनाचा मोठेपणा हा गुण आपल्या आईकडून घेतला हे सांगताना ते लिहितात, "मी माझ्या आईच्या अवती भवती वाढलो. साक्षात प्रेम असे जिच्याकडे पाहून म्हणावे अशी माझी आई आहे. तिची अन् शाळेची ओळख नसेलही पण तिचे कर्तृत्व दांडगे आहे. खऱ्या अर्थाने ती सुमाता आहे. आईच्या प्रेमाने वाढविलेली फार मोठी झालेली माणसे मी आजही जेंव्हा पाहतो, तेंव्हा मला माझी आई अधिक समजते. माझ्या कुटुंबात हीच खरी श्रीमंती आहे, या श्रीमंतीने मला मनाचा राजा बनायला

978-93-83401-45-1
Sonpeth PKSAN NO. 431516 ... Dist. Parbhani

सत्यशोधकी ब्राम्हणेतर चळवळीच्या पाठीमागचा जो शिक्षण हा प्रमुख मुद्दा पकडून यशवंतरावांनी शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. बहुजन समाजातील युवा पिढीला सत्यशोधक विचारांच्या संस्काराची शिदोरी ही आधुनिक शिक्षण पध्दतीमुळेच मिळेल असे दिनकरराव जवळकर म्हणत असत. हे विचार यशवंतरावांनी अनुकरणात आणले. कॉंग्रेस कवज्यात घ्या व तिच्यामार्फत राष्ट्रीय प्रवाहाच्याव्दारे बहुजनहित साधा. हा जो कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी दिलेला सल्ला यशवंतरावांनी कार्यवाहित आणला. यासंदर्भात रा.ना. चव्हाण म्हणतात "महाराष्ट्र कॉंग्रेस कबज्यात घेऊन बहुजन समाजाचे तिच्याचमार्फत येथे राज्य निर्माण करण्याचे विठ्ठलराव शिंदे यांचे स्वप्न यशवंतरावांनी पूर्ण केले. मुख्यमंत्री झाल्यावर मिळालेल्या सत्तेचा वापर यशवंतरावांनी बहुलोकहितार्थ केला.

त्यांना साहित्याची अत्यंत आवड आणि समजही होती. अधून मधून ते लिहित असत आणि प्रसंगानुरुप भाषणेही देत असत. लेखनीतून त्यांनी आत्मगत व्यक्त केले जे आवडले ते सांगितले, का आवडले त्याची मीमांसा केली. या संदर्भात प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक डॉ.नागनाथ कोत्तापले म्हणतात, "केवळ सत्तेसाठी राजकारण करणे हा यशवंतरावांचा स्वभाव नाही. त्यामुळे राजकारण बाहेरच्या क्षेत्रातील माणसही त्यांच्या जवळ आली. त्या व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करण्यातही यशवंतरावांना अतिशय आनंद वाटतो. अशा व्यक्तिमत्त्वामध्ये प्रसिध्द कादंबरीकार वि.स.खांडेकर आणि ग.दि. माडगूळकर यांचा निर्देश करावा लागेल. ग.ज्यं.माडखोलकरांचाही संबंध त्यांच्याशी आला. या लेखकांचे नेमके वेगळेपण कशात आहे हे यशवंतराव सादर करु शकले आहेत. खांडेकरांना ते प्रकाशाचा लेखक म्हणतात. जीवनातल्या परिवर्तनाची मागणी करताना लेखक त्यांना अतिशय जवळचा वाटतो. खांडेकर आशावादी आहेत, हे ही ते नोंदवून जातात. त्यांच्या संपूर्ण साहित्यात कुठेही अमावस्या आलेली नाही अशी नोंदही यशवंतराव घेतात." सुरेश भट, कुसुमाग्रज त्यांना मुखोद्गत होते. तर पु.ल. देशपांडे, वसंत कानेटकर, वसंत सबनीस, रणजीत देसाई, बा.भ. बोरकर, अनिल, मंगेश पाडगावकर, वसंत बापट यांच्याशी त्यांचे स्नेहानुबंध होते.

त्यांना वाचनाची विशेष आवड होती. दिवसातून २०–२५ पाने वाचल्याशिवाय ते झोपत नसत. त्यांचे पुष्कळसे वाचन प्रवासातच होत असे त्याबाबत ते म्हणतात, प्रवासात नित्याच्या कामाच्या कागदपत्रांच्या वाचनासोबत साहित्याचे वाचन हा एक उताराच असतो. शालेय जीवनापासूनच त्यांना वाचनाची आवड होती. एक आठवण सांगतांना म्हणतात, "कराडला त्यावेळी केसरी, ज्ञान प्रकाश व नवा काळ एवढीच वर्तमानपत्रे वाचावयास मिळत असत. अन सत्याग्रहाचे काय झाले, हे समजण्यासाठी मी रानातल्या वस्तीवरुन दोन–तीन मैल गावात येत असे. कंबरे इतक्या पाण्यातून नदी ओलांडून मी येत असे." ते विविध तऱ्हेच्या पुस्तकांचे वाचन करीत असत. गंभीर विचारप्रधान चरित्र, आत्मचरित्रे, कथा, कविता आणि कादंबरी अशा प्रकारचे वाङमय प्रवासात वाचत असत. वाचनामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वावर कसे परिणाम घडत गेले या संदर्भात ते एक आठवण सांगतात ते म्हणतात, "योगायोगाने ज्योतिबा फुले यांचे पंढरीनाथ

पाटील यांनी लिहिलेले छोटेखानी चरित्र मी वाचले ते चरित्र आज ज्याला चोपडे म्हणता येईल अशा आकाराचे होते. परंतु या छोटेखानी चरित्रग्रंथाने माझ्या जाणीवेच्या कक्षा रुंदावल्या, हे मला कबूल करावे लागेल" असे त्यांनी स्पष्टपणे नोंदवले आहे.

ग्रंथांचे महत्त्व ओळखून त्यांनी ग्रंथनिर्मिती व ग्रंथप्रसाराला खूप महत्त्व दिले. ते म्हणतात, केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करुन भागणार नाही, तर त्यांचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांव्दारे त्यांचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वत:चे ग्रंथालय असणे हे लक्षण प्रतिष्ठेचे मानले पाहिजे. मला असे वाटते की, एकप्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत हे घातक आहे, त्यांची यातून ग्रंथप्रसाराची तळमळ लक्षात येते.

मराठी माणूस, मराठी भाषा आणि मराठी साहित्य या विषयी त्यांना विलक्षण आत्मीयता होती. चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य असे जे समीकरण त्याकाळात निर्माण झाले होते ते त्यांना अपुरे वाटते. मानवी जीवन सुंदर करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या सर्व गोष्टीवर गांभीर्याने चिंतन व्हावे, असे त्यांना वाटते. मानवी प्रगतीतील अडथळयावर पण गंभीरपणे चर्चा व्हावी असेही ते म्हणत. यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला पाहिजे असे त्यांना वाटते. विद्यापीठांनी आता मराठी साहित्याला मराठीतून निर्माण होणाऱ्या विविध विषयावरील ग्रंथांना प्रोत्साहन दिले पाहिजे. विद्यापीठांनी जर मराठी लेखकांना हिरवा कंदील दाखविला तर आपोआप मराठी लेखक पुढे येतील व मराठी ग्रंथनिर्मिती करतील असे ते म्हणत. त्यांनी मांडलेला हा विचार आजही तितकाच महत्त्वाचा वाटतो.

थोडक्यात यशवंतराव जरी राजकारणी असले तरी त्यांची साहित्यिक जाण तेवढीच प्रगल्भ होती. मराठी माणूस, मराठी भाषा आणि मराठी साहित्यावर नितांत श्रध्दा होती. या श्रध्देपोटीच मराठी भाषेला राज्य भाषेचा दर्जा त्यांनी प्राप्त करुन दिला. साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना करुन नवोदित लेखकांना प्रोत्साहन दिले. मराठी भाषेचा विश्वकोष निर्माण करण्यासाठी विश्वकोष मंडळाची स्थापना केली. कविवर्य यशवंत यांची महाराष्ट्र कवी म्हणून निवड केली. तर चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी करमणूक करात सूट दिली. या त्यांच्या कार्यामुळेच तर ग्रामीण कवी ना.धो. महानोर यांनी "आभाळा येवढा माणूस" या यथोचित शब्दात त्यांचा गौरव केला आहे. त्यांच्या साहित्यविषयक भूमिकेसंबंधी डॉ. नागनाथ कोत्तापले लिहितात, "वेळोवेळी त्यांनी कलेसंबंधी, साहित्यासंबंधी आणि भाषेसंबंधी चिंतन प्रकट केले आहे. ते स्पष्ट, निर्भीड आणि नवी दिशा देणारे आहे, असे असले तरी सहजता हा ही त्यांच्या चिंतनाचा विषय आहे" आणि ते खरे आहे.

संदर्भ ग्रंथ :-


- कृष्णाकाठ – यशवंतराव चव्हाण
- ऋणानुबंध – यशवंतराव चव्हाण
- अस्मिता महाराष्ट्राची:यशवंतराव चव्हाण – मो.नि.ठोके
- यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व – शंकर सारडा
- यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व – गोविंद तळवळकर


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani